आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in    बुधवार दिनांक 05/08/2026    METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 175 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# आमदार सुनील शेळके यांच्या प्रयत्नांना यश



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**तळेगाव दाभाडे : तळेगाव दाभाडे शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या आंध्र धरण पाणी प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या फिल्टर प्लांट आणि पाण्याच्या टाकीसाठी लागणारी सुमारे साडेतीन एकर जागा "गुड ऑफ सर्व्हंट" संस्थेने नगरपरिषदेला उपलब्ध करून दिली असून, या जागेची सरकारी मोजणी रविवारी करण्यात आली.**

आमदार सुनील शेळके यांच्या विशेष प्रयत्नातून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागला असून, शहराच्या वाढत्या लोकसंख्येला शुद्ध आणि मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याची माहिती नगराध्यक्ष संतोष दाभाडे यांनी दिली.

आंध्र धरणातून तळेगाव शहरासाठी दरवर्षी 5.094 दशलक्ष घनमीटर पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत दररोज 22 दशलक्ष लिटर पाण्याचा उपसा केला जाणार असून, 15 लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी आणि 20 दशलक्ष लिटर क्षमतेचा अत्याधुनिक फिल्टर प्लांट उभारण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे तळेगाव शहरातील पाणीटंचाईची समस्या मोठ्या प्रमाणात दूर होण्यास मदत होणार असून, नागरिकांना नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे.

आज सोमवार दि. 3 ऑगस्ट रोजी झालेल्या सरकारी मोजणीवेळी "गुड ऑफ सर्व्हंट" संस्थेचे सचिव लाला सर, ॲड. सचिन नवले, नगरसेवक शिवाजी आगळे, निखिल भगत, सत्यम खांडगे, सूरज सातकर, प्रभुलाल तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. शहराच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, आगामी काळात या प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला जाणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

# निहाल पानसरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत होमिओपॅथी आरोग्य शिबिर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे यांचे चिरंजीव निहाल पानसरे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकमान्य होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲंड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने काळभोरनगर येथील जनसंपर्क कार्यालयात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने लाभ घेतला.**



शिबिरामध्ये मोफत दंतचिकित्सा, रक्तदाब तपासणी, मधुमेह (साखर) तपासणी तसेच रक्तातील विविध घटकांची तपासणी करण्यात आली.

तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शनही केले.

यावेळी डॉ. संध्या घाणेकर यांनी दंतचिकित्सा करून योग्य उपचार व सल्ला दिला. तसेच डॉ. प्रतीक्षा रताडिया, डॉ. श्रुती श्रीराम, डॉ. गौरी कुंभार आणि त्यांच्या सहकारी डॉक्टरांनी रक्तदाब, साखर व इतर वैद्यकीय तपासण्या केल्या.

शिबिराला नागरिकांचा मिळालेला भरघोस प्रतिसाद पाहून डॉक्टरांच्या संपूर्ण टीमने समाधान व्यक्त केले. यापुढे दर सोमवार ते शनिवार सकाळी 10.30 ते 12.30 या वेळेत होमिओपॅथी ओपीडी नियमित सुरु राहणार असून, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपचार मोफत, तर इतर नागरिकांना अत्यल्प दरात उपचार उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती डॉक्टरांकडून देण्यात आली.

या उपक्रमाचे आयोजन विशाल बाळासाहेब काळभोर (मा. प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, महाराष्ट्र तथा मा. अध्यक्ष, पिंपरी विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) यांच्या पुढाकारातून करण्यात आले. नागरिकांनी या आरोग्य उपक्रमाचे स्वागत करत आयोजक आणि वैद्यकीय पथकाचे आभार मानले.

# कोट्यवधींचा बटरफ्लाय ब्रिज... वाहतुकीसाठी की पार्किंगसाठी?

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : शहराच्या विकासाचे प्रतीक म्हणून उभारण्यात आलेला थेरगाव-चिंचवड बटरफ्लाय ब्रिज आता नव्या वादाच्या केंद्रस्थानी आला आहे. नागरिकांच्या वाहतुकीसाठी उभारण्यात आलेल्या या पुलावर मोठ्या प्रमाणात खाजगी वाहने, शाळेच्या बसेस आणि अवजड वाहने पार्क केली जात असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी बांधण्यात आला की वाहनांच्या पार्किंगसाठी, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.**




पुलावर अनेक वाहने दीर्घकाळ उभी असल्याचे दिसून आले. पुलावर उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहतुकीवर परिणाम होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. सार्वजनिक पुलाचा अशा प्रकारे पार्किंगसाठी वापर होत असेल, तर संबंधित प्रशासन आणि वाहतूक विभाग याकडे दुर्लक्ष करत आहेत का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

या पुलाचा मूळ उद्देश थेरगाव, चिंचवड, वाकड आणि परिसरातील वाहतूक सुरळीत करणे हा होता. मात्र, काही नागरिकांच्या मते पुलाच्या सध्याच्या जोडणीमुळे अपेक्षित प्रमाणात वाहतुकीचा लाभ मिळत नाही. या विषयावर प्रशासनाकडून अधिकृत खुलासा होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

विशेष म्हणजे, या प्रकल्पावर आधीच कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे.

त्यानंतर पुलाच्या सौंदर्यीकरणासाठीही निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांकडून प्रश्न विचारले जात आहेत की, वाहतूक व्यवस्थापन, पार्किंग नियंत्रण आणि उर्वरित सुविधांवर प्रथम लक्ष देणे अधिक आवश्यक नव्हते का?

दरम्यान, पुलावर अवजड वाहनांचे पार्किंग सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य आहे का, पुलावर





पार्किंगला अधिकृत परवानगी आहे का, तसेच वाहतूक पोलिसांनी याबाबत कोणती कारवाई केली आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

आता या संपूर्ण प्रकरणात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, वाहतूक विभाग आणि संबंधित प्रशासन कोणती भूमिका घेणार, बटरफ्लाय ब्रिजवरील पार्किंगला आळा बसणार का, आणि नागरिकांसाठी उभारलेला हा पूल त्याच्या मूळ उद्देशानुसार पूर्ण क्षमतेने वापरला जाणार का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.



# पवना नदीच्या पुलावरील तुटलेले संरक्षण कठडे जैसे थे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरातील चिंचवड येथील आदित्य बिर्ला हॉस्पिटलजवळ पवना नदीवरील पुलावरील तुटलेले संरक्षण कठडे तब्बल 40 दिवस उलटूनही दुरुस्त करण्यात आले नसल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दररोज हजारो वाहनचालक आणि शेकडो पदचारी या पुलाचा वापर करत असतानाही दुरुस्तीचे काम रखडल्याने पालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**






मागील महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पवना नदीला मोठा पूर आला होता. पुराचे पाणी आदित्य बिर्ला हॉस्पिटलजवळील पुलावरुन वाहू लागल्याने पुलावरील संरक्षण कठडे आणि लोखंडी जाळीचे मोठे नुकसान झाले. पुराचे पाणी ओसरल्यानंतरही या नुकसानग्रस्त कठड्यांची दुरुस्ती तातडीने होणे अपेक्षित होते. मात्र, तब्बल 40 दिवस उलटूनही प्रत्यक्ष दुरुस्ती झालेली नाही.

घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने पुलावर "फुटपाथवरील संरक्षण कठडे धोकादायक असून दुरुस्तीचे काम सुरु आहे. कृपया पदचाऱ्यांनी सावधानता बाळगावी." असा इशारा देणारा फलक लावला. मात्र, फलक लावणे आणि प्रत्यक्ष दुरुस्ती करणे यात मोठा फरक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. केवळ सूचना देऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नसून, नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असल्याचे मत परिसरातील नागरिकांनी व्यक्त केले आहे.

हा पूल चिंचवड, वालेकरवाडी आणि परिसरातील अनेक भागांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. याच मार्गावर आदित्य बिर्ला हॉस्पिटल असल्यामुळे रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह नागरिकांची दिवसभर मोठ्या प्रमाणात ये-जा सुरु असते. तसेच या मार्गावर वाहनांचीही सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत तुटलेले संरक्षण कठडे अपघाताला निमंत्रण देत असल्याची भीती व्यक्त होत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात दृश्यमानता कमी असताना या ठिकाणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी तातडीने दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

पालिका प्रशासनाने या पुलावरील संरक्षण कठड्यांच्या दुरुस्तीला प्राधान्य देऊन काम तातडीने पूर्ण करावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. अन्यथा एखादी गंभीर दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. आता आदित्य बिर्ला हॉस्पिटलजवळील या पुलावरील तुटलेले संरक्षण कठडे नेमके कधी दुरुस्त होणार आणि नागरिकांना सुरक्षित प्रवासाची हमी कधी मिळणार, याकडे संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 05/08/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# प्रभाग क्र.23 कचरामुक्त करा

## शमीम हुसेन सोशल एज्युकेशन फाउंडेशनची मागणी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक 23 कचरा मुक्त करावा व कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी शमीम हुसेन सोशल एज्युकेशन फाउंडेशन वतीने करण्यात आली आहे.**










प्रभाग क्र. 23 मध्ये सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे कचरा टाकला जात असल्याने परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी व साथीच्या रोगांचा धोका वाढत आहे. या गंभीर समस्येवर तातडीने उपाय योजना करण्याची मागणी करत शमीम हुसेन सोशल एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने 'ग' क्षेत्रीय कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. सदर निवेदन 'ग' प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका मनीषा प्रमोद पवार यांना तसेच प्रभाग अधिकारी मुकेश कोळप यांना देण्यात आले.

निवेदनात विशेषतः 'ग' क्षेत्रीय कार्यालयासमोरील मुख्य रस्ता, कावेरी नगर सबवे पुलाखालील परिसर तसेच थेरगावमधील विविध सार्वजनिक ठिकाणी सातत्याने कचरा टाकला जात असल्याचे नमूद करण्यात आले. महापालिकेकडून घराघरांत घंटागाडीची सुविधा उपलब्ध असतानाही काही नागरिकांकडून जाणीवपूर्वक सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जात असल्यामुळे परिसराचे विद्रूपीकरण होत असून नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

फाउंडेशनच्या वतीने संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करणे, नियमित स्वच्छता मोहीम राबविणे, "येथे कचरा टाकू नये" असे सूचना फलक लावणे, तसेच नागरिकांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदन स्वीकारल्यानंतर 'ग' क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने उपद्रव पथकाला आवश्यक सूचना दिल्या. कचरा टाकल्या जाणाऱ्या ठिकाणी जनजागृती मोहीम राबविणे, सूचना फलक लावणे, सीसीटीव्ही कॅमेरे अद्ययावत करणे आणि कचरा टाकणाऱ्या व्यक्तींविरुद्ध दंडात्मक कारवाईसाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेश त्यांनी दिले. याचप्रमाणे, 'ग' प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका मनीषा प्रमोद पवार यांनाही निवेदन देण्यात आले. त्यांनीही निवेदनाची दखल घेत सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल तसेच प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या जातील, असे आश्वासन दिले.

यावेळी शमीम हुसेन सोशल एज्युकेशन फाउंडेशनच्या अध्यक्षा शबनम सय्यद, उपाध्यक्षा गजाला सय्यद, सहसचिव आसिया इनामदार तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत प्रभाग क्रमांक 23 स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त करण्यासाठी प्रशासनाने सातत्याने कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन शहर स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. मात्र, ही जबाबदारी केवळ प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाचीही आहे. नागरिकांनी घरातील कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता महापालिकेच्या नियमित कचरा संकलन गाडीतच द्यावा. विशेषतः प्रभाग क्रमांक 23 मधील नागरिकांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर महापालिकेकडून दंडात्मक कारवाई करण्यात येईल. स्वच्छ परिसर हीच आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

**- मनिषा प्रमोद पवार**
ग प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका



आपला प्रभाग क्रमांक 23 कचरामुक्त व्हावा, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. मात्र, या मोहिमेत नागरिकांचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, असे मी सर्वांना आवाहन करते. नियमांचे उल्लंघन करून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांविरुद्ध नाईलाजास्तव दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, जनजागृती मोहीम राबविणे आणि कचरामुक्त प्रभागासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात येतील. स्वच्छ प्रभाग ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

**- मुकेश कोळप**
ग क्षेत्रीय अधिकारी

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968